# उन्मेष

डॉ. र. मी. शेजवलकर

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
स. क्र. २५९३



REFBK-0025878
REFBK-0025878

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 JUN 1989

26 NOV 1995

24 DEC 1994

( क्रु. मा. पहा )

५०००-३-८४

संदर्भ काव्य
२५९३
२५८७८
२८।५।८९

२५९३
काव्य २५८७८
२८।५।८९

रमंथ
रमंथ
रमंथ
॥रमंथ॥

या काव्यसंग्रहासाठी मार्गदर्शन, सूचना केल्याबद्दल
प्रा० वसंत पाटणकर, प्रा० चंद्रकांत मर्गज,
प्रा० अशोक बागवे, श्री० सुरेश मथुरे
आणि समस्त 'मौज' प्रकाशन परिवार
यांचे मनःपूर्वक आभार.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९३
ग्रं. क्र. ३५८७८
काव्य स्तंभालय
REFBK-0025878
REFBK-0025878

र मं थ

र मं थ

# र मं थ

र० म० शेजवलकर

पहिली आवृत्ती : मार्च १९८९

© १९८९, डॉ० र० म० शेजवलकर

मुखपृष्ठ
परमानंद शेलार

किंमत
तीस रुपये

प्रकाशक
सौ० सुनीता र० शेजवलकर
विजय कुंटे बिल्डिंग
भास्कर कॉलनी, नौपाडा
ठाणे ४०० ६०२

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

वितरक
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मित्रवर्य अशोक बागवे यास
स्नेहपूर्वक

# अनुक्रम


झाडांचे पाय १
माझ्यावर ओथंबणारा
काळा ढग २
नजरबंदी ३
करार ४
वसुली ६
आपल्याच मोजमापात ७
उद्घाटन ८
वादळं ९
याला पुरावा काय ? १०
हल्ली जरासं ताणलं ११
पूल १२
झगडा १३
समेट १४
उगीचच्च १५
घड्याळ १६
वेसण १७
सर्व्हे १८
खाटीक २०
मुखवट्यांची तयारी २१
कोणत्याही क्षणी २२
नकाशा २३
व्यसन २४
विसरण्याच्या आठवणी २५
थरथर २६
एकदा २७
मला सांग २८
झाड २९
जर-तर ३०
या माझ्या कविमित्राच्या
वेडेपणाला ३१
प्लँचेट ३२
बहुधा आता ते ३४
तोच ३५
बोगद्यातून जाताना ३६
दुष्काळ ३७
प्रश्न ३८
कुचंबणा ३९
स्वतःचे डोळे फोडीत ४०
अंधारदाट खोलीत ४१
अलीकडे ४२
पेपरवेट ४३

संगणकाचे स्वप्न ४४
घट्ट कोडग्या आश्रितपणं ४५
बऱ्याच दिवसांनी भेटल्यावर ४६
मनमोकळ्या आकाशात ४७
पर्याय ४८
आत्ममग्न आरसे ५०
तात्पर्य ५२
माझ्या अळणी आयुष्यासाठी ५३
वाळवंटात ५४
विस्तृत मोकळ्या आवाराला ५५
खळबळ ५६
या अवाढव्य पसरलेल्या
वाचनालयात ५८
मुरूम ६०
आश्चर्याची गोष्ट म्हणजे ६१
तो : एक दलित चरित्र
वाचताना ६२
फक्त ६४
विहीर ६५
संकेत ६६
ध्वनिमुद्रित अपघात ६७
गुत्ता ६८
जाणीव ७०
पॅरोल ७१
आठ-त्रेपन्नच्या खिडकीतून ७२
शेंडी ७४
विचार ७५
प्रतिबंधक मुर्दाड लस ७६
उतारवयाच्या अंधुक
उजेडात ७७
पत्रांचं एक बरं असतं ७८
अतिदक्षता कक्षात ७९
चिरशांती ८०
सरपणाच्या शोधात ८२
बरेच वय होऊन
जाते तेव्हा ८३
गोधडी ८४
अवेळी भूतदयेच्या भीतीने ८६
दोघांच्याही पडद्याआड ८९
पहाटस्वप्नांसाठी ९०

२५९१३
काव्य

## झाडांचे पाय

डहाळीवर डुलणाऱ्या
फुलाच्या पाकळीने
झाडांच्या फारसे खोलात शिरू नये
झाडांचेही पाय मातीचेच असतात.
झाडानेही फुलाच्या पाकळीवरच्या
दवबिंदूंच्या डागाची चौकशी करू नये
फुलाचे गालही दूधसायीचे असतात.

## माझ्यावर ओथंबणारा काळा ढग

माझ्यावर ओथंबणारा काळा ढग
आत्ता कोसळेल या प्रतीक्षेत
बघता बघता डोळे झांजरले.
मग सकाळी
बेपत्ता ढगाचा पत्ता विचारण्यासाठी
मी गवतावरच्या दवबिंदूंना जागे केले.

## नजरबंदी

गर्द हिरवेपण तोलून धरणाऱ्या
तुतीच्या पानाच्या शिरा एकाएकी ताठरल्या
रेशीमकिड्याच्या आक्रमणाने.
आपल्या पेशींच्या जाळ्यामार्फत
धोक्याचा संदेशही त्याने झाडाला दिला.
आपल्या सरहद्दी अधिकाधिक संकुचित करीत,
पान मोठ्या आशेने झाडाकडे डोळे लावून :
झाडाकडून काहीही हालचाल नाही.
पानाने आपल्या उरल्यासुरल्या सांगाड्याच्या आधाराने
मान वर करून झाडाकडे पाहिले,
तर झाड रेशीमधाग्यांत नजरबंदी होऊन पडलेले.

## करार

मनातल्या हिंस्र जनावरांच्या शिकारखान्याशी
माझा अलिखित करार :
ती पिंजऱ्यात असताना मी त्यांचे ऐकायचे
आणि पिंजऱ्याबाहेर त्यांनी माझे.
त्यांचं खाणंपिणं, आवडीनिवडी, दवापाणी,
आणि खाजगी मोसम मी सांभाळायचे.
त्या बदल्यात त्यांनी चारचौघांसमोर
तारेवरून तोल सावरीत चालायचे,
शेळीबरोबर सहभोजन स्वीकारायचे,
आगीतून उड्या मारायच्या, एवढंच काय
माझी मानदेखील आपल्या जबड्यात सुखरूपपणे पकडायची.

बघ्यांनी कौतुक करून टाळ्या वाजवल्या
की आपले काम संपवून निमूट पिंजऱ्यात परतायचे,
कधीकाळी अडीअडचणीला, शक्य होईल तेवढी
माणुसकी दाखवायची.

प्रसंगी परिस्थिती काबूत आणण्यासाठी
मीसुद्धा जनावर व्हायचे.
एक नियम मात्र दोघांनीही सारखाच पाळायचा :
'या सर्कशीचा रिंगमास्टर कोण' हा प्रश्न
एकमेकांना विचारायचा नाही.

# वसुली

झाडाच्या कर्जाची रक्कम
फुलानं पहाटेच फेडून टाकली,
दवबिंदूंच्या व्याजासकट;
तरीही देठातलं हिरवं नातं तुटेना.
फुलानं दुपारपर्यंत वाट पाहिली.
मग ते संतापानं फुलून लाल झालं—
तेव्हा मात्र संध्याकाळी घाईघाईने
झाडाने कर्जफेडीची पावती
वाऱ्याबरोबर पाठवून दिली,
आणि ते
नव्या वसुलीच्या तयारीला लागलं.

# आपल्याच मोजमापात

हिमालयाची सर्व शिखरे दीड ते दोन इंच.
अरबी समुद्र सुमारे दोन फूट पसरलेला.
गंगा-ब्रह्मपुत्रा सुताएवढ्या जाडीच्या.
आकाशाला भिडणाऱ्या घनदाट वृक्षांची जंगले.
काही ठिपक्यांचे पुंज टेकड्यांचे.
प्रांत आणि देश,
काही चौरस सेंटीमीटर्सच्या दंतुर परिघात.

आपल्याच मोजमापात
सर्व गोष्टी बसवायच्या म्हटले,
की माणसांना नकाशात दाखवायचे तरी कसे?

## उद्घाटन

प्रत्येक क्षणाच्या दुभंग पात्यांवर
सारखाच झळाळ.
कापणेही आधीच ठरलेले.
एक सप्कन आवाज,
आजूबाजूला टाळ्यांचा कडकडाट,
आपले आणखी एक उद्घाटन
आतल्या आत....

# वादळं

समुद्र ढवळून काढणारी
रंगपेटीतल्या रंगांची हजारो वादळं
तुझ्या डोळ्यांत उसळताना
तू भिरभिरून मला शोधतेस,
तेव्हा मी स्वतःशीच हसतो.
वादळातला वारा
फारच थोड्यांना दिसतो,
नाही ?

# याला पुरावा काय ?

याला पुरावा काय ?
अशा अनेक गोष्टींचे पुरावे शोधता शोधता
त्यांचा इतिहास होत गेला.
तसतसा मी अलगद वर्तमानाच्या पंखांवर;
आता
इतिहासासाठी पुराव्यांचा शोध घेत....

## हल्ली जरासं ताणलं

हल्ली जरासं ताणलं
की आधीपासूनचे पांगुळवाणे पाय
अधिकच डळमळायला लागतात,
हातातल्या काठीच्या आधाराने
अवेळी स्वतंत्र वाटा शोधण्याच्या नादात
एकात एक वर्तुळांमधल्या कोशात
अधिकाधिक बंदिस्त होत....
पायांना ओढ नक्की कशाची ?
मातीची की दुसऱ्या पायांची ?

# पूल

त्यांनी मला पूल व्हायला सांगितलं
आणि मी वाकलो.
एक पाय ऐलतीरावर आणि दुसरा पैलतीरावर रोवून
मी पूल झालो.
वर्दळ वाढली,
बरंच पाणी वाहून गेलं.
पाण्यात गळ टाकून बसलेल्या माझ्या पायांना
इकडचं तिकडे करण्याचा पसारा झेपेना
तेव्हा त्यांनी आणखी एकाला पूल व्हायला सांगितलं.
माझा एक दीर्घ श्वास आणि सुटकेचा निःश्वास.
हातपाय कडकडा मोडीत
एक सणसणीत जांभई देण्याचं मी ठरवलं.
पण कमरेतल्या मणक्यांचं कॉंक्रिट झालेलं.
मी हताश उभा
दोन डगरींवर पाय ठेवून.
ऐलतीर-पैलतीरांचे अंगठे धरून ओणवा....

# झगडा

एकाच कुटुंबात राहणाऱ्या
माकडाचा आणि तत्त्वचिंतकाचा झगडा
मिटवायचा तरी कसा ?
खोलात सूर मारावा
तर मोकळ्या आभाळाचा ठाव सुटतो;
आणि नव्या नव्या झाडांच्या
उंच फांद्या गाठाव्यात
तर मुळांचा पत्ताच बेपत्ता होतो.
आडवी भिंत घालून द्यावी
तर दाराच्या पाटीवर नाव कुणाचे लिहायचे ?
आणि दोन स्वतंत्र बिऱ्हाडे थाटावीत
तर घराचे घरपण कशात शोधायचे ?

या माकडाचा आणि तत्त्वचिंतकाचा झगडा
मिटवायचा तरी कसा ?
माकडाला पाण्यात बुडवून
की तत्त्वचिंतकाला गुदगुल्या करून ?

# समेट

सशानं बराच विचार करायचा
टणटणण्याआधी,
आणि कासवानंही
पाठीच्या ढालीआडून
सशाच्या अहंकारावर विश्वासायचं नाही.
दोघांनी एकमेकांशी
शर्यत अजिबात लावायची नाही :
हातात हात घालून दूरवर फिरायला जायचं
न मळलेल्या वाटांवरून.

## उगीचच

तर सर्वप्रथम
एक सहजसाध्य सरळ रेषा घ्यायची.
तिच्या एका टोकाशी
विचित्रकोनातली एक स्वप्नरेषा जोडायची.
नंतर रग लागेपर्यंत दोन्ही पाय ताठ ताणायचे
आणि प्रत्येक रेषेचे टोक गाठायचे.
दोन्ही टोकांना
एक पाय घट्ट रोवून
दुसरा पाय ताठपणे हवेत फिरवायचा
की एक गिर्रेबाज फुली तयार होते.
फुलीच्या मध्यावर काटकोनात नाक ठेवायचे
आणि इतके सगळे केलेच आहे म्हणून
रेषांच्या सांध्यातून
नाकासमोर सुसाट पळत सुटायचे—

## घड्याळ

चोहोबाजूंनी खडा पहारा देणारे
उंच मनोऱ्यावरचे घड्याळ.
केवळ एक संकेतस्थान.
बरेच जण पायाशी जमतात
चोरट्या भेटीगाठींसाठी;
आणि दूरचे दूरवरूनच पाळतात त्याचे संकेत
आदरपूर्वक अंतर राखून.
घड्याळाला अलीकडे वाटतं,
आपले दोन्ही हात लांब करून
दूरच्यांना कवेत घ्यावं मायेनं;
आणि आणखी एखादा पाय फुटावा,
पायथ्यालगतची चोरटी कुजबूज ऐकत
आपल्याच मस्तीत
डोलत राहण्यासाठी.

## वेसण

मान हलवू देत नाही
कणखर तेढा पीळ असलेली
दारिद्र्य नावाची वेसण.
काचत राहते नाकपुड्यांतून
दोन्ही बाजूंची हिरवळ नाकारीत,
नाकासमोरचा रस्ता दाखवीत....
मान खाली घातली,
की वेसण आपोआप थोडी सैल होते
कणखर तेढा पीळ आतल्या आत उलगडतो,
आणि संयमाच्या घंटा केविलवाण्या खुळखुळतात
शांतपणे कडबा चघळताना....

## सर्व्हे

माझ्या थकलेल्या हातात
एक जाडजूड फाइल
पिवळ्या छापील माहितीपत्रकांनी गर्भार झालेली.
फाइलवर विषयही स्पष्टपणे लिहिलेला :
'दूरदर्शन आणि व्हिडिओचे शैक्षणिक क्षेत्रावरील दुष्परिणाम'.
फाइलमधील छापील माहितीपत्रकांवर
तीच तीच रडगाणी नोंदवून कंटाळलेल्या
काही मोकळ्या जागा आणि रकाने.
सर्वच काम आता यांत्रिकपणे चाललेले....
जवळच्या शेवटच्या कोऱ्या माहितीपत्रकासह
यांत्रिकपणे मी एका शाळेचे जिने चढू लागतो.
जिन्यावरच्या पायरीवर यांत्रिकपणेच धडपडतो.
मी आता शाळेच्या मुख्याध्यापकांसमोर, एका खुर्चीत—

माहितीपत्रकातील रेकॉर्ड पुन्हा एकदा वाजवून दाखवीत.
"आपल्या शाळेवर किंवा विद्यार्थ्यांवर किंवा शिक्षकांवर
किंवा दोघांच्या अभ्यासावर किंवा एकमेकांच्या संबंधावर,
दूरदर्शन आणि व्हिडिओचे काय काय दुष्परिणाम झालेत ?"
"काहीच नाहीत." मुख्याध्यापक उत्तर देतात.
"कारण ?" मी चकित होऊन विचारतो.
"देवाची मर्जी...." मुख्याध्यापक डोळ्यांवरचा गॉगल काढून
हसऱ्या खाचांनी, आपल्या अंध विद्यालयाच्या पाटीकडे
बोट दाखवतात.
मी शरमेनं अर्धमेला होऊन जायला निघतो
तेव्हा ते जिन्यापर्यंत सोडायला येत म्हणतात,
"सांभाळून उतरा—
जिन्याची तळातली पायरी जरा डगडगत्येय...."

# खाटीक

मनातल्या खाटकाचं काम
इतके दिवस समाधानकारकपणे चाललेलं :
प्रत्येक विचाराच्या गळ्याला
जाणीवपूर्वक नख लावायचं,
रगती गोळा करून, कातडं सोलायचं,
मेंदू आणि काळीज वेगवेगळं करून
आतड्यांची घाण धुवायची,
आणि शेवटी
पंचेंद्रियं व इतर अनावश्यक अवयव काढलेलं
बिनचेहऱ्याचं सोलीव सत्य
उलटं करून निर्विकारपणे टांगायचं.

अलीकडे मात्र मला या खाटकाचा संशय येऊ लागलाय :
काही दिवसांपूर्वी
त्याच्या उशाशी
भूतदयेची फूस लावणारी छापील पत्रकं सापडली.

## मुखवट्यांची तयारी

नाट्यगृहातील रंगपटात
प्रयोगाआधी बराच वेळ
मुखवट्यांची तयारी :
नकली दाढीमिश्यांचे खुपणारे केस,
त्याच्या डिंकाची चेहराभरून जळजळ,
भरजरी कपड्यांची बोचणारी जर,
आणि गालांवरच्या रंगीत मलमांनी केलेले
हवाबंद कोंडमारे.
मनातल्या मनात नाटकातल्या संवादांची,
वारंवार खंडित पडणारी जुळवाजुळव.
तोच व्यवस्थापक आत येऊन जाहीर करतात :
पुरेसे प्रेक्षक न जमल्याने
आजचा खेळ रद्द केलाय.

# कोणत्याही क्षणी

समजा :
या भिंतीवरच्या घड्याळाच्या
आखूड किंवा लांब हाताने
तबकडीबाहेरच्या गोष्टींचा हव्यास धरला,
आणि 'आला क्षण-गेला क्षण'च्या दोन पायांतले अंतर
ते कायम राखू शकले नाही तर ?
किंवा बाह्यप्रेरणेचे अंतःप्रेरणेशी बिनसून
ते वेळीअवेळी तोंड वाजवू लागले तर ?
किंवा वयोमानानुसार पूर्वीइतका पीळ न राहिल्याने,
एखाद्या क्षुल्लक अपघाताने
अख्खे घड्याळच योगभ्रष्ट झाले तर ?
तात्पर्य :
कोणत्याही वेळी बारा वाजू शकतात;
आणि ती वेळ कळण्यापुरतीच घड्याळे असतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९२३

## नकाशा

आपण दोघांनी
प्रांताप्रांतांना जोडणारा
वाहतुकीच्या मार्गाचा एक नकाशा काढला होता,
तैलरंग पाण्यात मिसळून,
जमीन आणि पाणी वेगवेगळे दाखवीत
सारे जलमार्ग डोळ्यांच्या मासोळ्यांनी सांकेतिक केलेले
आणि हवाईमार्ग भुरभुरत्या बटांनी....
जमिनीवरच्या वाटा खडी चितारून,
रूळवाटेसाठी तुटक समांतर रेषा
त्यावरचे पूल ठळक टिंबांनी दाखवीत
राजधानीच्या जागी एका चिमुकल्या घराचे चित्र....

आता आठवते ते सहन केलेले एक परचक्र
आणि सीमाविभाजनाची रेषा अटळपणे
आपल्या राजधानीवरून गेलेली—

## व्यसन

दु:खाची नागवेल फोफावू लागली
की पानांचे व्यसन जडवून घ्यावे.
पिकलेली पिवळीजर्द पाने रोजच्या रोज खुडून काढली
की वेलीचे सौभाग्यही अक्षय राहते.
पानांचे देठ कापून नाळ तोडावी
आणि उपेक्षेच्या वातड शिरांचे उंचवटे
नखलून पानासमांतर करावे.
जळजळीत वेदनांचा चुना,
विद्रोहाचा कात,
लाल रंगाचा तोल साधण्यासाठी,
बदनामीची चिमूटभर जाफरानी;
चार खडतर क्षणांची खांडे कातरून पान जमवावे
आणि एक सणसणीत पिचकारी मारावी
आपल्याच आत्ममग्न लक्तरांवर.

# विसरण्याच्या आठवणी

एकमेकांचा रीतसर निरोप घेतल्यावर
ठराविक वेळी ठराविक आठवणी
एकमेकांच्या हटकून !
आठवणींना विसरण्याचे आपले समजूतदार
व्यक्तिगत वेगवेगळे प्रयत्न,
आठवणींनीच उधळून लावलेले.
शेवटचा उपाय म्हणून
आठवणींच्या एकाच वेळी
एकमेकांना विसरायचे ठरविले—
पण आपली घड्याळे अजूनही
वेगवेगळ्या वेळा दाखवितात.

## थरथर

तसा तो सरळसोट,
आकाशाकडे नजर ठेवून वाढणारा,
पण कावऱ्याबावऱ्या नजरेनं आधार शोधणाऱ्या वेलीला
तोच आवडला.
त्याच्याकडे पाहण्याच्या निमित्ताने,
तिला प्रथमच आकाश पहायला मिळाले म्हणून.
ती त्याच्यासाठी खुळावली;
तिने त्याला अलगद स्पर्श करून पाहिला,
तरीही तो मख्खपणे उभा.
तो आपल्यासाठी वाकणार नाही,
आपणच आभाळ व्हायला हवे
हे तिने चाणाक्षपणे ओळखले;
आणि हळूच त्याच्याभोवती
एक नाजूक विळखा घातला.
तेव्हा मात्र
दोन वाळकी पाने वरून गरगरत तिच्या माथ्यावर उतरली;
तिची कुरळी बट
कितीतरी वेळ थरथरत राहिली....

# एकदा

सतत हुलकावण्या देणाऱ्या प्रश्नचिन्हाला
एकदा मी खिंडीतच गाठले,
त्याची गचांडी धरून
त्याचा गळा आवळायला सुरुवात करताच
मरता मरता ते माझ्या हातातच व्यायले.

## मला सांग

भणाणल्या वाऱ्यात
झाडांची पानं
नदीच्या पाण्यात बघून मोजण्याचा तुझा हट्ट.
त्यात पाण्याची खळखळ.
मला सांग :
तू पानं मोजतेस की,
भोवऱ्याच्या तळातल्या गारगोट्या ?

## झाड

एखाद्या चौसोपी वाड्यातील
पिढ्यान्‌पिढ्या नांदणारे एक विशाल कुटुंब.
हिरव्या छत्र्या उघडून
उन्हापावसात बागडणारी पतवंडे.
आज्ञाधारक लवचिक डहाळ्यांची नातवंडे.
त्यांचे तोल सांभाळणाऱ्या
वंशवृद्धीच्या असंख्य शाखा.
या सर्वांचा भार
आपल्या मजबूत खांद्यांवर पेलणारा कुटुंबप्रमुख;
आणि या चौसोपी वाड्याचा पाया
जमिनीखाली गाडून घेणाऱ्या पूर्वजांचे खडतर भूतकाळ.

# जर-तर

उत्पादनाला वाजवी किंमत मिळण्यासाठी
कवितांवर आय० एस० आय० च्या शिक्क्यांची योजना :
प्रत्येक कवितेचे सर्व घटक
वेगळे करून तपासायचे, आणि
आशय-अभिव्यक्तींचे गुणोत्तर प्रमाण
शून्यापेक्षा जास्त संख्येने समसमान न आल्यास
कविता बाद करून मातीआड लोटायच्या.
पण समजा :
जर त्याच मातीआडून हिरवी-पिवळी पाती नाचवीत
काही तरारू लागले तर ?
मग मातीसाठीही आय० एस० आय० शिक्क्यांची योजना.

आता प्रश्न इतकाच,
की मातीच्या तपासणीसाठी खोदलेला खड्डा
कोणत्या कवितांनी बुजवायचा ?
आणि बाद झालेली माती
कोणत्या मातीआड लोटायची ?

# या माझ्या कविमित्राच्या वेडेपणाला

या माझ्या कविमित्राच्या वेडेपणाला
म्हणायचे तरी काय ?
घरातल्या घरात बाग फुलवतो :
एका परातीत माती घालून,
वर थोडी मोहरी पेरून,
चमच्याचमच्याने पाणी पाजतो.
टरफले फोडून, मोहरी चिमुकले पंजे नाचवते
तेव्हा हाच वेड्यासारखा टाळ्या पिटतो.
कोंब तरारून हिरवेकंच
तेव्हा याचेच डोळे रानगर्द.
एक दिवस सर्व रोपे माना टाकतात
आणि त्यांच्या मुड्यांभोवती
असंख्य चिलटे फेर धरतात.
मग एका जाडजूड भिंगातून
हा वेडा चिलटांकडे पाहतो
आणि फुलपाखरांची गाणी
गात गात रडतो.

## प्लँचेट

पाट, उदबत्ती, खडू, पालथे भांडे, मी
आणि काही मृतात्मे.
पाटावर आपल्या जोडीदाराची वाट पाहणारी
काही अक्षरे आणि आकडे.
उसासत्या उदबत्तीच्या धुरात माझे आवाहन :
पौराणिक-ऐतिहासिक,
सामाजिक-राजकारणी,
कर्तबगार-अकर्तबगार,
लहानथोर, स्त्रीपुरुष समस्त मृतात्म्यांनो,
एकत्र येऊन उत्तर द्या :

मी कुठे हरवलोय ?
मृतात्म्यांच्या हालचालींची अदृश्य शांतता.
पाटावरचे पालथे भांडे
अंड्याच्या बलकासारखे अक्षरांवरून घरंगळते.
प्रत्येक मृतात्म्याचे एकच उत्तर :
"मग आम्ही काय शोधतोय ?"

हल्ली कुणीही प्लँचेट केले
तर न बोलवताही
मी उत्तर द्यायला जातो....

# बहुधा आता ते

चोहोबाजूंनी लाटा खेळवीत
मधोमध ठामपणे उभी
माझ्या पाणकोट किल्ल्याची अभेद्य तटबंदी.
शब्दांनी खूप वेळा पर्वतकाय वादळं उठवीत,
तोंडातून फेस काढीत
निकरानं टकरा मारल्या....
पाणसुरुंग ठासून पाहिले,
कधी दूरवरच्या फडफडत्या शिडांची लाळूच दाखवली,
पोटातल्या लाचार नजराण्यांची ताटं उधळली,
समुद्रपक्ष्यांची कसरत करीत,
डोंबाऱ्यासारखी पोटावर थाप मारीत
भीकदेखील मागितली.
पण तटबंदीचा प्रत्येक चिरा ठामठोक अभेद्य.
तेव्हा मात्र
पृष्ठभागावर सारं कसं शांत शांत....
बहुधा आता ते पायाखालून
माझ्या कविता कुरतडू लागलेत....

# तोच

छापखान्यातल्या बहुतेक खिळ्यांचे चेहरे
बेदम मार खाऊन काळेकुळकुळीत
आणि अस्तित्व डागांपुरते मर्यादित.
पूर्णविरामांचे खण रिकामे होत चाललेले,
बदली कामगारांमुळे
मजकुरात अकारण क्लिष्ट शब्दांची भर.
तरीही निढावलेल्या हातांनी जुळवाजुळव,
बांधिलकी असह्य झालेल्या चौकटीत.
एक थकलेला समाधानाचा सुस्कारा
दोन्ही नाकपुड्यांत दाटून आलेला,
तोच
मुद्राराक्षसांचे युद्ध घोषित....

# बोगद्यातून जाताना

एकान्ताला डोळे
आणि विराटाला आंधळेपण.
कान मुके,
एक तीव्र निःस्तब्ध सजगता नाकाशी.
रंध्रारंध्राशी झोंबणारा
थंडगार काळोख हुंगणारी
नव्या प्रकाशक्षणांची अपार उत्सुकता.
काजळभोग भोगताना
एका सुसंगत वर्तमान तालावर,
मध्येच एक प्रकाशझुंबर खळ्ळकन फुटते,
गाडी दुसऱ्या बोगद्यात शिरते—

# दुष्काळ

शेतांच्या तडकलेल्या चौरसचौरस तुकड्यांत
सर्वत्र भेगाळलेली मने.
काही खुरट्या आशांची झुडुपे बांधाच्या कडेने,
औपचारिक हास्यात कशीबशी जीव धरून.
All is well with the world चे रणरणते ऊन
आणि त्याच्या झळांनी
सूर्याकडे बघण्याची ताकद हरवून बसलेले डोळे.
मृगजळदेखील चारही वाटा चौखूर पसार,
असंख्य शिकारी मागावर सुटल्याच्या भीतीने.
एकमेकांच्या डोळयांतल्या पाण्याच्या आधारावर
कसेबसे तग धरून राहिलेले जीव.

माझ्याही चेहऱ्यावर एक मख्ख रखरखाट,
दुष्काळाची छाया
आता माझ्यापर्यंत येऊन पोहोचलेली....

## प्रश्न

मूठ बंद केल्यावर
अवघे प्राक्तन बंदिस्त केल्याचा भाबडेपणा
जसजसा कमी होत गेला,
तसतसा माझ्या मातीचा
एक दमट दगड बनत गेला.
अनेक पावसाळ्यांची तेढ
काळजात खोलवर रुजवून घेत
ऊनवाऱ्यांत अचल राहून
चांदण्यांच्या कवडशांपासून अंग चोरता चोरता
आता—
या दगडाने नवीनच प्रश्न उभा केलाय :
मातीपासून दगड की दगडापासून माती ?

## कुचंबणा

जिभेची विलक्षण कुचंबणा,
आपल्या उंचवट्याआड लपविलेल्या
काही चवदार आठवणींमुळे....
अलीकडे उंचवटे घोळवून घोळवून
जमिनीसमांतर झालेले.
त्यांतल्या षड्सांच्या सीमारेषा
एकमेकांत विचित्रपणे मिसळून देत.
आता एक अभेद्य कडवटपणा,
प्रत्येक आवंढ्याबरोबर
अधिकच आत—खोलवर....

# स्वतःचे डोळे फोडीत

स्वतःचे डोळे फोडून घेण्याची
कडेकोट तयारी,
एका हातभर खोल खड्डयात.
कवचाआडची अभेद्य ओल
मातीआड लोटीत,
एक ओली झिरप सोबत देत,
उबदार अंधारकोठडीत
ओलेती तगमग शिगेला,
आणि एक कोंब,
ऐटदारपणे बाहेर,
स्वतःचेच डोळे फोडून घेत.

## अंधारदाट खोलीत

अहंकारातून फटी शोधत
स्वच्छ सूर्यप्रकाश रोंरावत आत शिरला,
आणि अंधारदाट खोलीत
एकच खकाणा उडाला.
बंद दाराखिडक्यांचे धरलेले सांधे,
कुरकुरत मोकळे होऊ लागले.
जळमटे थरारली,
कोळी सैरभैर झाले.
असंख्य जीवजिवाणू ठसाठस ठसकू लागले,
वळचणीच्या नव्या जागा शोधता शोधता....
भिंतीत चिणलेल्या लाकडी खांबाची वाळवी
वारुळाआडच्या कवचात हादरली,
आणि कवडशांची पाने खेळवीत
खांबाला पुन्हा पालवी फुटली.
वसंतगीते आठवण्याच्या प्रयत्नात
आता खांब स्वतःच एक कोकीळ झाला.

# अलीकडे

डोळ्यांची पंचांगे
दिवसेंदिवस समजूतदार होत चाललीयत,
माझ्या प्रत्येक दिवसाचे
फलज्योतिष सांगताना—
अलीकडे त्यांना अचूक कळू लागलेत
वळवाचे अनपेक्षित मोसम,
आणि जळजळीत निखाऱ्यांचे तिथीनक्षत्र.
जवळीकतेच्या कोणत्याही क्षणी
मनपसंत कुंडली बनवून देणाऱ्या नजरेत,
मी माझेच भविष्य हरवू लागलोय हळूहळू....

## पेपरवेट

माझ्या दगडी मनाच्या
काचबिंदू झालेल्या
प्रचंड काचेरी बुब्बुळांत,
काही रंगीत बुडबुड्यांची बिलोरी स्वप्ने,
असंख्य फडफडत्या पंखांवर ठाण मांडून.
आपल्या नावाने जोगवा मागणाऱ्यांबद्दल
बसल्या जागी खंत करीत....
आतला एकही रंगीत बुडबुडा
पृष्ठभागावर येऊन फुटणार नाही,
याची कलात्मक दक्षता घेता घेता....

## संगणकाचे स्वप्न

कवटीआडच्या बंदिस्त संगणकात
दिनदर्शिकेतल्या आखून दिलेल्या चौकोनातील
मिताक्षरी सांकेतिक नोंद.
सुरुवातीला पटलावर कर्ब-काळोख....
नंतर काही सूक्ष्म....अतिसूक्ष्म प्रकाशकण
हळू हळू पटलाला पहाटजाग,
कणांचे पुंजके–पुंजक्यांचे गुंजके
आणि त्यांची धनंतर रेटारेटी....
आता पटलावर विस्कटून गेलेली
सुरेख रांगोळी,
आणि संगणक यांत्रिकपणे
त्याचे आकाशगंगेचे स्वप्न पूर्ण करण्याच्या प्रयत्नात

# घट्ट कोडग्या आश्रितपणं

प्रवासाला निघण्याआधीच
पायाला घट्टे पाडून तयार.
डोक्यावरची अश्वत्थामी जखम
खरी तर केव्हाच भरलीय,
तरीही त्याची खाच दाखवीत
लाचार भिक्षुकी वृत्तीनं तेलाची मागणी;
आणि कुणीही जराशी आपुलकी दाखवताच
डोक्यापर्यंत खोल रुतवून घ्यायचं,
घट्ट कोडग्या आश्रितपणं....

# ब-याच दिवसांनी भेटल्यावर

ब-याच दिवसांनी भेटल्यावर
आठवणींची हाडं चघळता चघळता
ती तिच्याबद्दल बोलत होती....
मध्येच थांबून तिने विचारले :
"एकाच स्त्रीच्या प्राप्तीसाठी झगडणाऱ्या
दोन पुरुषांची गोष्ट तुला माहितीय ?"
मी कष्टाने नकारार्थी मान हलवली.
आणि मग ती उत्साहाने
स्वतःच्या नवऱ्याबद्दल आणि मुलाबद्दल सांगू लागली.

# मनमोकळ्या आकाशात

मनमोकळ्या आकाशात
शेपटीवर तोल सावरीत
स्वच्छंदपणे डोलणाऱ्या
या फुलपाखरी पतंगाचा विचित्र चाळा—माझ्याच मनासारखा !
नाममात्र आधार उरलेल्या दोराच्या रिळाकडे
एवढे वाकून कशाला बघायचे ?
प्रत्येक झोक्यासाठी
त्याची परवानगी कशाला काढायची ?
आणि रिळाचे जरा दुर्लक्ष झाले,
तर स्वत:वरच चिडून गोता कशाला खायचा ?
जमिनीवरून सुटलेले पाय मातीचेच आहेत
याची खात्री करायलाच हवी का ?

# पर्याय

अमर्याद शक्तीने
बेगुमान फुसांडणाऱ्या या मस्तवाल बैलाला
अलीकडे झालंय तरी काय ?
कोलदांडा घालण्याआधीच,
आपले चारही पाय निमूटपणे पुढे करतोय
नालबंद करताना.
पतिव्रतेच्या पदरासारखी
शेपूटही सावरून घेतोय वारंवार.
माती उधळणाऱ्या त्याच्या चौखुरांत
शेणकळा पसरत चाललीय,
त्याच्या लालबुंद डोळ्यांतील आव्हानाला
आवाहनाची अवकळा येताना.

वशिंडही हिसकत नाही, मान जुवाखाली सारताना.
अधूनमधून धडका देतो त्याही,
शिंगांची धार बोथट करण्यापुरत्या.
माथ्यावरचा चांदवा दिवसेदिवस पांढराशुभ्र होत चाललाय.
चिलटामाश्यांनी त्याच्या पाठीवर उघडलेल्या वसाहती
अलीकडे कायदेशीर होऊ लागल्याहेत.

काल तर मी त्याला
खाचराच्या भेगाळलेल्या भुईकडे
मान खाली घालून टक लावताना पाहिलं.
मला वाटतं,
तो आता मातीला पर्याय शोधतोय.

## आत्ममग्न आरसे

एकाचे दोन आणि
डावेउजवे करण्याच्या
कर्तृत्वशून्य आयुष्याला कंटाळलेले आरसे
आपल्या चकचकीत मुलाम्याआड आत्ममग्न !
किती दिवस उंचवट्यांच्या मोजमापातले सौंदर्य बघायचे ?
त्याच त्याच राठ दाढीचे खुंट
रोजच्या रोज खरडताना पाह्यचे ?
अनेकांचे पाठलाग पाठीवर घेत
किती दिवस रस्त्यावरून पळायचे ?
कुणाही पोराटोराच्या जीवघेण्या खेळांनी
जागोजाग तडकून घ्यायचे ?
किती दिवस निर्विकारपणे मुखवट्यांआडचे चेहरे पहायचे ?

अंतर्बाह्य अहंकाराने फुलून
'राईचा पर्वत आणि पर्वताच्या राईचे' खेळ करायचे ?
किती दिवस कुंकवाचे डाग
सौभाग्यलेणी म्हणून मिरवीत फिरायचे ?
दुसऱ्यांच्या वाळवणांची राखण करीत
निरपराध पाखरांचे पंख जाळायचे ?
—हे सर्व आता कुणालातरी विचारायलाच हवे !

प्रचंड गुंता डोक्यात घेऊन
सर्व आरसे एकमेकांसमोर सल्लामसलतीसाठी,
आणि आता त्यांच्यातले अंतर
परस्परांच्या असंख्य प्रतिबिंबांनी आणखीनच वाढलेले....

## तात्पर्य

खरे तर तसे
पंचतंत्रातल्या कथेसारखेच घडले :
पारध्यांनी दाणे टाकून लावलेल्या जाळ्यात
माझ्यासारखे अनेक पोपट एकाच वेळी सापडले.
पंचतंत्र वाचलेला एक पोपट म्हणाला,
"घाबरू नका, एकजुटीने योजना आखा."
आम्ही सर्व जण तयारीला लागलो
आणि जाळ्यासह एकाच वेळी उडालो.
तूर्तास आम्ही पारध्यापासून सुटका करून घेतलीय
आणि आता प्रत्येक जण
जाळ्यात गुंतलेले आपले पाय कसे सोडवायचे
या विचारात गुंतला आहे.
तात्पर्य :
एकजुटीने पारध्यापासून सुटका करून घेता येते,
जाळ्यापासून नाही.

## माझ्या अळणी आयुष्यासाठी

शब्दांची उबदार लाट
भरतीच्या क्षणी पायाखालून सुखावत जातानाच
ओहटीची थंडगार खळखळ सुरू होते,
पायाखालची वाळू सरकवीत.
सर्वत्र शंखशिंपल्यांची कलेवरे
आणि एक खारट चिकचिकाट.
अचानक सूर्याचे हजारो काचबिंदू चकाकतात,
मी शांतपणे उठतो
आणि मिठाचा एकेक कण गोळा करू लागतो,
माझ्या अळणी आयुष्यासाठी.

# वाळवंटात

अफाट क्षितिजसमांतर पसरलेल्या वाळवंटात
वाळूच्या प्रत्येक कणाकणावर
आपला एकेक केस उपटून टाकीत
सूर्य बोडका झालेला,
आणि मृगजळ खाणाखुणा करीत
माझे पौरुष चाळवीत बसलेले.
मला सोबतीसाठी एका प्रतिध्वनीची जरुरी वाटली
म्हणून मी एक आकंठ हाक मारली.
माझे शब्द मलासुद्धा ऐकू आले नाहीत,
तेव्हा मात्र पायांखालची वाळूच सरकली
आणि घशाला एक प्रचंड शोष.
कसाबसा मी माझ्या पायांजवळ थांबलो;
पायांखालची वाळू पशापशाने उकरू लागलो,
तेव्हा वाळूखाली
माझी हाक जशीच्या तशी पुरलेली सापडली.

२५८३
२५८८८
२८।५।८९

## विस्तृत मोकळ्या आवाराला

विस्तृत मोकळ्या आवाराला कुंपण घालून,
हिंस्रतेला आकाशाच्या स्वाधीन करीत
अभयारण्य घोषित करायचे;
आपणच आपल्याला अभयदान देत,
कुंपणापलीकडून काळजी घेणे
सोयीचे पडते म्हणून.
त्यानंतर अधूनमधून फेरफटकाही मारायचा
कुंपणातल्याच एखाद्या माणसाळलेल्या पाठीवरून,
'जनावर अनावर झालं तर'ची भीती
सतत उराशी बाळगत....

## खळबळ

पाण्याविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न
वाऱ्याने वारंवार केला.
चिथावणीचा संदेश त्याने तळापर्यंत पोहोचवला.
तळात खळबळ आणि बंडाची तयारी.
सहभागासाठी अनेकांकडे विचारणा :
गारगोट्यांनी थंडपणे नकार दिला,
आपली चार टाळकी एकत्र आली की,
डोक्याला डोकी घासून ठिणग्या पडण्याच्या भीतीने.
जलचरांनी स्पष्टच सांगितले,
पाण्यात राहून पाण्याशी वैर शक्य नाही
आणि पाण्याबाहेर कशालाच अर्थ नाही.

शंखांनी सांगितले,
आमचा उपयोग फक्त युद्ध जाहीर करण्यापुरता.
शिंपल्यांनी तर आपले ओठच घट्ट मिटून घेतले.
पाणवनस्पती माना हलवीत म्हणाल्या,
पाण्याशिवाय आमचे पानही हलत नाही.

खळबळीच्या पायांखालची वाळूच सरकली
आणि सरतेशेवटी खळबळ एकटीच वर आली,
उद्रेकाने तोंडातून फेस काढीत,
वरचेवर फुटून गेली.

# या अवाढव्य पसरलेल्या वाचनालयात

या अवाढव्य पसरलेल्या वाचनालयात
कितीतरी दिवस
मी माझ्या मनाजोगते पुस्तक हुडकतोय :
बरीचशी आधीच वाचून झालेली,
आणि मला हवी असलेली
नेमकी दुसऱ्यांच्या खात्यांवर मांडलेली.
कानशिले गरम करणारी गात्रे
आरसपानी गुळगुळीत मुखपृष्ठांना केव्हाच विटलीयत,
आणि मखरातल्या व्यथावेदनांनी
कातडीआडचा गेंडा केव्हाच सुस्तावलाय,
आपल्या सखोल घनदाट चरबीआड.

एखादे आवडीचे म्हणून उचलावे
तर तेही हसते केविलवाणे
आपले अधलेमधले दात पडलेले बोळके नाचवीत.
आणि असंख्य संदर्भपक्षी,
चिकटपट्ट्यांनी सांधलेले आपले केविलवाणे पंख फडफडवीत.

मी समजूतदारपणे चष्म्याच्या दुकानात
काचा बदलून घेण्यासाठी.
काचा मिळाल्यायत,
पण त्या चौकटीचे बंधन नाकारतायत.

## मुरूम

आणि एक दिवस
बांधकामखात्याचा ताबा
एका सळसळत्या रक्ताच्या उमद्या अधिकाऱ्याने घेतला.
सूत्रे हाती येताच
त्याने घोषणा दिली :
'गुळगुळीतपणाला व्यक्तिमत्त्व नसते'
तेव्हा यापुढे
प्रत्येक तुळतुळीत सडकेवर हिरवळ जोपासायची.
कागदपत्रे तयार झाली,
वरिष्ठ पातळीवरून हुकूम निघाला
आणि कामगार
हिरवळीच्या लागवडीसाठी
चेहऱ्यावर मुरूम पसरू लागले.

# आश्चर्याची गोष्ट म्हणजे

तिच्याकडच्या गुप्त बातम्या देताना
माझे खाजगी दूत विलक्षण सजग, कार्यक्षम.
एक दिवस माझ्या अंगणातल्या आंब्याच्या झाडाचे पानन् पान
रातोरात पिवळेफटफटीत पडले.
नंतर पानांचा पाचोळा न वाजताही
वेळीअवेळी पानझड होत राहिली.
पानझडीतल्या पानांच्या शिरा
तणावपूर्ण ताठ ठसठसलेल्या,
अख्ख्या पानाचा तोल सांभाळून बसलेल्या.
याच काळात अचानक खुरटा मोहोरही झाडाला आला.
आणि त्याच वेळी एक काळा ढग
माझ्या अंगणात उभा कोसळला.
झाडावरच्या पक्ष्यांनी स्थलांतर केले.
लांबूनच ते झाडाची विचारपूस करू लागले.
आश्चर्याची गोष्ट म्हणजे
झाड वठले नाही,
जमेल तसे वाढतच राहिले.

## तो : एक दलित चरित्र वाचताना

गुरांच्या शेणातील ज्वारीच्या भाकऱ्या करून
भूक भागविल्याचे वाचून,
त्याच्या काळजात चर्रर झाले.
दोन वेळच्या खळगीसाठी केलेल्या चोऱ्यांचा
कबुलीजबाब वाचून,
त्याचे आतडे पिळवटून निघाले.
विहीर बाटविल्याबद्दल बेदम बडविल्याचे वाचून,
त्याच्या अंगावर वळ उठले.
अनैतिक संबंधाबद्दलचे खुल्लमखुल्ला निवेदन वाचून,
त्याला थोडे गारगार वाटले.
शिक्षणासाठी केलेली उरफोड वाचून,
"शाब्बास रे पठ्ठे" असे उस्फूर्त उद्गारही

त्याच्या तोंडून निघाले.
शिक्षणानंतरची बेकार वणवण वाचताना,
त्याच्याच पायांना घट्टे पडले.
पावलापुरता प्रकाश भाकणारी करुणा वाचताना
त्याचे मन थोडे अंतर्मुखही झाले.

तेवढ्यात शेवटचे प्रकरण आले:
जातपात, अस्पृश्यता आणि सवर्णांबद्दलचे
प्रक्षोभक विचार वाचता वाचता,
त्याचे काळीज गर्र्रकन उलटे फिरले:
ऑफिसमधल्या कांबळ्याला गोत्यात कसे आणायचे,
यावर विचार करीत त्याने पुस्तक मिटले.

# फक्त

'सहा बाय तीन'च्या पायावर
स्वाभिमानाची एकेक वीट रचता रचता,
मी माझ्या अहंकाराचे मजले चढवले.
समर्थ बचावाच्या रेती-चुन्याने भिंती लिंपून,
वर नशिबाचे छप्पर थाटले.
खिडक्यांना जाळीदार चौकटी बांधल्या,
त्या हवा गाळून आतबाहेर सोडू लागल्या.
कर्तृत्वाच्या फिक्या गुलाबी रंगाने
माझे घरकूल तर झक्क सजले—
फक्त दरवाजे बांधण्याचे तेवढे राहून गेले.

## विहीर

खरे तर
दोन्ही हातांनी खळाळ उधळीत होतो
नितळ झऱ्यांचे,
पण त्यांना माझ्या पाषाणकोरड्या भागातच
विहिरी खोदायच्या होत्या.
लाथ मारून पाणी काढण्याच्या हत्यारांनी
त्यांची प्रचंड सिद्धता,
आणि जल्लोषात छिद्रान्वेषण सुरू
माझ्या सर्व विनंत्या नाकारून,
मी कठोरपणे घालून घेतलेल्या
असंख्य दुलयांच्या घड्या छेदीत निर्दयपणे.
थराथरातून थरकाप उडवीत जाणाऱ्या
त्यांच्या धारदार हत्यारांची धग,
आणि माझा उसळू पाहणारा लाव्हा.
अखेर हत्यार भिडलेच !
एक जळजळीत झरा सुसांडत हत्याराच्या वाटेने.
आता ते मला
अत्यंत आदराने जपतात,
ज्वालाग्राही तेलाची विहीर म्हणून....

## संकेत

सुरळीत मानवी संबंधांसाठी
डाक आणि तार खात्याकडून
काही सांकेतिक आकडे उपलब्ध :
१. तुम्ही आमचे, आम्ही तुमचे, एकदा बैठक करू या !
२. तुमच्या आनंदात सहभागी आहे, एकदा बैठक करू या !
३. तुमच्या दुःखात सहभागी आहे, एकदा बैठक करू या !
४. बरेच दिवसांत बातमी नाही, एकदा बैठक करू या !
५. एबैक !!
कृपया संबंधितांनी
सांकेतिक आकडे वापरून
शब्दांचा अपव्यय टाळावा.

# ध्वनिमुद्रित अपघात

तीक्ष्ण सुईने माझ्या मनाच्या परिघावरून
चराचराला कापत जाणाऱ्या
कंगोरेदार काळ्या चकचकीत विश्वात
केवढा हलकल्लोळ,
एका लहानशा चऱ्याने.
सुईने काही वाटचाल
परिघाऐवजी त्रिज्येवरून केल्याबद्दल.
प्रत्येक कंगोऱ्यात चर्चा,
किती सूर मेले, किती स्वर जखमी झाले.
घातपाताचीही शंका.
अपघातस्थळी
घायाळ स्वनिमांची
एकच तक्रार
पुन्हा पुन्हा :
'किती SS किती SSS किती SSS किती....
सांगूSS तुला ?"

## गुत्ता

आंबूस प्रदूषणात
तंबाखूचे दाट धुके,
धूसर पिवळ्या प्रकाशात
अनेक तोंडांची कुजबुजती वचवच,
स्वतःशीच किंचाळणारा एक वेडा खोका,
डोकी फोडल्यासारखे सोडाबाटल्यांचे चीत्कार,
ओरखडणारे काचेरी खणखणाट,
हल्लक बधिर मेंदू....
या सर्वांकडे दुर्लक्ष करून
गुत्त्याच्या चारही भिंती,
आपला रोजचा खेळ सुरू करतात
ओळीओळीनं गोष्ट पुढे न्यायचा :
तर....एक होतं देऊळ,
चार गुत्त्यांच्या मापाचं.
देवळात होता गाभारा,

धुरानं कोंदणारा.
त्यात होता एक पुजारी,
गुत्तेवाल्यासारखाच—पोट सुटलेला.
देवळात होत्या घंटा,
किंचाळून नेहमीच डोकं उठवायच्या.
सोड्याच्या बाटल्यांसारखे नारळ फुटायचे,
चण्याफुटाण्यांचा प्रसाद वाटायचे....
त्या देवळाला चार भिंती....

गुत्त्याच्या भिंती नेहमीप्रमाणे
याच ओळीपाशी थबकतात,
त्यांना एकदम मळमळल्यासारखे होते
आणि
अख्ख्या गुत्त्याची झिंग चढून,
भेलकांडत गोष्ट खाली पडते....

## जाणीव

इशारती देणारा रूळगाडीचा कंदील
बराच गोंधळलाय,
उतारवयानं.
जन्मजात तैलबुद्धीचा अहंकार विसरून....
अलीकडे
लाल काच डोळ्यासमोर आली,
की रुळावरचा प्रत्येक दगड निखारा बनतो,
आणि हिरव्या आडपड्याने
लोखंडी रुळांनाही फांद्या फुटतात समांतर,
थेट डोळ्यांत घुसणाऱ्या.
गाड्यांनी तरी किती ताटकळायचे
बाजूच्या फलाटांवर
किंकाळ्या फोडीत....

# पॅरोल

एक दिवस
आठ-नऊच्या घाईघाईत
रेल्वेचा पास वारल्याची बातमी कळते.
पँटीचे बक्कल हाय खाऊन तुटून पडते,
चपलेचा अंगठा
गुरुदक्षिणेसाठी कुणीतरी कापून घेतल्याचे पाहून,
बुटांचे बंद बेबंद होतात,
आणि कपडे अंगभर सुरकुततात.
चाव्यांचा जुडगा लहान मुलाप्रमाणे
भलत्या वेळी लपाछपीचा डाव खेळू लागतो.
खिशातला रुमाल बघता बघता दिशांतर होतो.
पेनच्या घशाला कोरड पडते,
आणि खिसे दुष्काळग्रस्तीचे प्रदेश जाहीर करतात.
निमूटपणे माघार घेत, मी
आकस्मिक रजेचे पांढरे निशाण उभारतो,
चौवीस तासांच्या पॅरोलवरती
एक दिवस माणसांत येतो.

## आठ-त्रेपन्नच्या खिडकीतून

हजेरीपत्रकाची वेळ गाठण्याच्या गडबडीतले
विजेचे खांब,
लयदारपणे पक्ष्यांच्या पर्सेस खांद्यावर नाचविणाऱ्या
घोळदार तारा,
पेन्शनीला आल्यासारखे
संथपणे आळसावत सरकणारे डोंगर,
पगाराच्या तारखेच्या चिंतेत अडखळणारी
झाडे,
आखीव आयुष्य खटकत मागे टाकणारे
शेताखाचरांचे चौकोनी तुकडे,

आणि त्यांचे खुरटे आलेख काढीत
खालीवर होणाऱ्या गवतांच्या लवलवत्या रेषा,
अंगठा उठवून पसार होणारे
चतुर्थश्रेणी खडी दगड,
शर्यतीत हमखास हरणार याची खात्री असूनही
धावता धावता हळूहळू मागे पडत जाणारे
असंख्य निनावी मुखवटे,
आणि एकाच जागी स्थिर असल्याची
सुखद अहंकारी जाणीव,
आठ-त्रेपन्नच्या खिडकीबाहेर बघताना—

## शेंडी

गाईच्या पावलाइतक्या परिघातील
बाढलेल्या तणांच्या मुळाशी
धगधगता जात्यंध धर्माभिमान
आसपासचा मुलूख निष्पर्ण बेचिराख करणारा....
आपला पीळ आपणच घट्ट करीत
वर गाठ मारून
तण फोफावतात मुळातून आतल्या आत
आपली पक्कड घट्ट जमवत,
भुरभुरतात वर आपल्याच मस्तीत.
जगज्जेत्यांचीही ताकद होत नाही
त्यांना हात लावण्याची....
यांच्या मुळाला बसलेला एकच हिसडा
अवघे साम्राज्य धुळीस मिळवण्याइतका
जोरकस....

# विचार

मोठ्या उत्साहाने
तो एका राजकीय बैठकीसाठी गेला,
पण तिथे त्याला कुणीच ओळखले नाही.
म्हणून मग तो एका सामाजिक संस्थेत—
पण ओळखपत्रावर 'पक्षाचा' अधिकृत शिक्का नाही म्हणून
प्रवेश नाकारला.
तिथून निराश होऊन तो एका देवळात गेला,
पण पुजाऱ्याने त्याला त्याची जात विचारली,
धर्म विचारला,
आणि तो त्याला खरंच आठवेना.
शेवटी तो कंटाळून
एका मनोरंजनाच्या कार्यक्रमाला गेला—
त्याच्या उपस्थितीने प्रेक्षक चिडले, खवळले,
त्यांनी त्याला धरले, बेदम मारून हाकून दिले.
तेव्हापासून तो निराश होऊन एकाकी राहू लागला
गर्दीला चार हात दूर ठेवीत....

## प्रतिबंधक मुर्दाड लस

काही इंगळीदार जळजळीत वेदनांचे आक्रमण
माझ्या नसानसांतून रक्ताच्या प्रत्येक थेंबाथेंबात,
रक्तपेशींच्या युद्धपातळीवरील हालचाली
परकीय आक्रमण थोपवून धरण्यासाठी,
बेफिकीरीची सर्व दळे युद्धासाठी सज्ज
आणि एक तुंबळ ऊर्जायुद्ध.
घायाळ पांढऱ्या पेशींच्या जिवाचे पाणी पाणी
झिरपत झिरपत माझ्या रंध्रारंध्रात,
आणि आता—
एक प्रतिबंधक मुर्दाड लस तयार :
कोणत्याही संवेदनाक्षम रोगावरची.

# उतारवयाच्या अंधुक उजेडात

उतारवयाच्या अंधुक उजेडात
एकेक दार मोठ्या जिकीरीने लावलेले,
काहींना थोड्या जबरदस्तीनेच दडपलेले
त्यांच्या कुरकुरणाऱ्या बिजागऱ्यांकडे दुर्लक्ष करीत.
चेतनाकेंद्राचा रस्ता
जागच्या जागी सुरू होऊन संपलेला.
हात झटकून सुटकेचा श्वास सोडणार तोच
एकुलत्या एका उघड्या दारात
माझी नाठाळ प्रिया उभी,
विभ्रमचातुर्यलीलांचे जुने हत्यारबंद सैन्य घेऊन.
असंख्य उंबरठे ओलांडून,
गलितगात्र उपभोगशून्यता
आणि जन्मभर तिने दिलेल्या हुलकावण्या.
कुठेतरी झोपाळा कुरकुरलाच
तरीही दारातूनच बाजूला होत मी वाट मोकळी केली.
माझे पांगळे पाय हातांच्या शोधात होते,
आणि तिचे विस्कटलेले कुंकू—आपला धनी.

# पत्रांचं एक बरं असतं

पत्रांचं एक बरं असतं :
कोणत्याही पेटीला कायमचं घर मानण्याचं जाचक बंधन
त्यांच्यावरती कधीच नसतं.
पत्रांचं एक बरं असतं :
चारआठ आण्यांत त्यांना अख्खा माणूस पोटात घेता येतो
आणि काही अक्षरांच्या मोबदल्यात
पुन्हा तो उघडाही करून दाखवता येतो.
पत्रांचं आणखी एक बरं असतं :
माणसांच्या मदतीनं माणूस शोधत फिरणं
त्यांना छान जमतं;
आणि काम संपताच तारेत खोचून
स्वतःला बाजूला काढता येतं.

# अतिदक्षता कक्षात

माणसाला माणसातून उठवण्याची
केवढी ही दक्षता अतिदक्षता कक्षात.
एका जीवघेण्या थंड काजळएकान्तात,
वातानुकूलित यंत्राची मंद थरथर फक्त सोबतीला.
शेजारीच—
नाळ तोडण्याच्या आरोपाखाली
फाशी गेलेली सलाईनची बाटली.
वेगळ्याच भेटीगाठींची सुरुवात.
तीन पाळ्यांतल्या मख्ख परिचारिका आणि
अन्नाऐवजी औषधांनी पोट भरण्याचे कारस्थान रचणारे उपचारकर्ते.
एक अटळ भेट काही काळासाठी पुढे ढकलल्याच्या आनंदात,
जुन्या भेटीगाठी,
काचबंद खिडकीपलीकडे सोडून देत.
वर एक सक्त ताकीद :
कोणतेही विचार मनात आणायचे नाहीत.
दिवसेदिवस अस्पृश्य होत चालल्याचेसुद्धा....

## चिरशांती

दोस्तहो—
त्या दिवशी उगीचच एवढी गर्दी केलीत,
कवटी फुटेपर्यंत थांबलात,
माझ्यावरची प्रासंगिक गुणवर्णनं
जांभई आवरीत ऐकत बसलात,
थोडेसे चकलात–थोडेसे चुकचुकलात,
तेराव्याला आठवणीनं
वीस रुपये चौरससेंटीमीटरचा
छापील शोक प्रगट केलात,
भूतदयेच्या नियमावलीतले सर्व नियम पाळलेत

माझ्या कुटुंबियांसाठी काही काळपर्यंत.

पण गड्यांनो—
एक गोष्ट मात्र खरंच चांगली केलीत :
माझ्या पहिल्या स्मृतिदिनी
तुम्ही तुमच्याच घरी
रमीचा सिक्वेन्स जुळवीत बसलात.
तेव्हाच मला समजले :
माझ्या निधनाने निर्माण झालेली पोकळी
तुमच्या नुसत्या जगण्यानेच भरून येण्यासारखी आहे.

# सरपणाच्या शोधात

माझ्या अपयशाला साठ वर्षे पूर्ण झाली,
तेव्हा मी माझ्या सरपणाच्या शोधात निघालो.
माझ्या जन्माच्या वेळीच माझे नाव
ज्या झाडावर लिहून ठेवले होते त्या....

प्रत्येक झाडावरच्या नावांच्या पाट्या वाचत वाचत
मी पुढे पुढे.
बरीच झाडं,
'आणखी किती वाढायचं?' या प्रश्नात,
अकाली खुरटलेली.
काहींची पानं तजेलदार,
काही फळाफुलांनी लगडलेली,
अनेक झाडं ताठपणं उभं राहण्याच्या प्रयत्नात वाकलेली.
आप्त इष्ट अनिष्टांच्या पाट्या वाचता वाचता
अचानक माझी नजर एका झाडाच्या कापलेल्या बुंध्यावर,
तर खोडावर माझे नाव कोरलेले.
पण वरचे झाड
केव्हाच कापून नेलेले....

# बरेच वय होऊन जाते तेव्हा

मेंदूला कावळा शिवण्याचे वय ठरलेले नसते.
बरेच वय होऊन जाते तेव्हा
मेंदूच्या पेशी वयात येतात.
थोडा संकोच, थोडी हुरहूर, बराचसा उन्माद.
दिवसेदिवस फैलावतात अस्पृश्यता विचारांची;
आणि अनेक गोष्टी अस्पर्श्य होत जातात,
शिडात हवा भरलेल्या होडीला
बघता बघता किनारा दुरावत जावा तशा.
शरीरातले हिणकस बाहेर पडू लागते
जन्मजात दुर्गंधी सोबत घेऊन.
एक सुखद जाणीव फुलारते पेशीपेशीतून,
गात्रांद्वारे गर्भाशयात
असंख्य स्वप्नबीजे जोजविण्याच्या अनावर उत्कंठतेने.

# गोधडी

ही तुकड्यातुकड्यांची अखंड गोधडी :
शेवरीच्या दुलईला मीच शोधलेला
एक भला मोठा चौकोनी पर्याय.

हा लहानसा आयत,
छातीवर कपडे दाटू लागले
त्या वेळच्या माझ्या जुन्या सदऱ्याचा.

हा घासून घासून विटलेला गोल,
वर्षातून फक्त एकच नवी विजार वापरणाऱ्या
वडिलांच्या व्यावहारिक दक्षतेचा.

ही जरतारी चौकट,
आईने स्वतःचा वधूवेश
स्वतःहून मोडीत काढलेल्या क्षणांची.

हा अक्काच्या साडीचा अख्खा पदर,
तिने झोपताना सांगितलेल्या गोष्टींतील
दुष्ट राक्षसांपासून बचाव करण्याचा.

हा कापून जोडलेला गुलाब,
ताईने साडया नेसायला सुरुवात केली
तेव्हाच्या तिच्या घोळदार झग्याचा.

हा आयाळ उडवणारा भडक घोडा,
कॉलेजच्या पहिल्या वर्षी मी हट्टच धरला तेव्हा
महिनाभर बसऐवजी चालत चालत कामावर जाणाऱ्या
वडिलांच्या भगभगीत पायांचा.

मध्येच ही लालचुटुक पट्टी,
शेजारच्या बेबीच्या मी वेण्या ओढायचो म्हणून
सासरी जाताना तिने आठवणीने काढून दिलेल्या रिबिनीची.

आणि हे अस्तर,
आईला मी पहिली साडी आणली
तेव्हा तिने स्वत:पुरत्या संपवलेल्या खडतर भूतकाळाचे.

हे अधलेमधले असंख्य तुकडे,
विसरायचे असताना कटाक्षाने आठवत राहणाऱ्या क्षणांचे,
आणि त्यांना ठिगळ लावलेला,
खारट पाण्याचे वाळलेले डाग पडलेला
हा इवलासा हातरुमाल
गोधडीसह आयुष्यभर मला लपेटून.

# अवेळी भूतदयेच्या भीतीने

कविसंमेलनानंतर त्याच्या घरी जाणे
सहसा मी टाळत असतो,
अवेळी भूतदयेच्या भीतीने.
म्हणजे तसे सगळे ठीक असते;
त्याला अगत्य, मला आपुलकी,
आणि दोघांनाही एकमेकांच्या सहवासाची ओढ वाटते.
पण त्याच्या घरातले
रेशनकार्डावरच्या दोन युनिट्सपुरते त्याचे अस्तित्व
काळीज कुरतडून टाकते.
तसा तो बोलतोही छान
कवी आणि कवितांबद्दल,
त्या वेळी त्याच्या जिभेवर सरस्वती नाचते.
माझी नजर मात्र
त्याच्या बनियनच्या भोकांत गुंतून पडते.
माझ्या कानांत रेंगाळत असतो,
कविसंमेलनातला त्याच्या काव्यप्रतिभेचा संगमरवरी ताजमहाल.
याच आठवणीत माझी नजर त्याच्या मुमताजकडे जाते :

बरगड्यांच्या थडग्यातला श्वास
उरीपोटी ती जपत असते.
सूर्यचंद्रांच्या मशाली पेटवणारी त्याची प्रतिभा
स्वतःची चुरगळलेली चारमिनार
माझ्याच काड्यापेटीवर पेटवते.
तो मला चहाचा आग्रह करतो—
त्याच्या ज्यूलियटच्या मूक खाणाखुणांकडे दुर्लक्ष करून.
माझ्या सहनशक्तीचे 'काउंट डाउन' सुरू होते
तेव्हा एक कप चहाच्या दुधासाठी त्याची ज्यूलियट
मागच्या दाराने बाहेर पडते.
मी हे सगळे हताशपणे बघत असतो
तेव्हा हा मित्र तुकारामावर बोलत बसतो.
जिभेच्या सर्व संवेदनांचे मार्ग रोखून
एका बहिऱ्या कपातून मी चहा घेतो.
कोपऱ्यात करवादणाऱ्या त्याच्या बापाच्या छातीतील ढास
मलाच असह्य होत असते,

त्या वेळी स्वारी केशवसुतांपर्यंत येऊन पोहोचते.
विजोड कपबशीतल्या बहिऱ्या कपांना कधीही कान फुटणार नाहीत
आणि त्याच्या हवेतल्या रथाची चाके,
अधर्मानेही जमिनीला टेकणार नाहीत
हे माझ्याएवढेच त्यालाही कळत असते,
त्या वेळी मंडळी मर्ढेकरांपर्यंत येते.
अचानक त्याची बछडी आईची तक्रार घेऊन
त्याच्या पायांत घोटाळते.
तो तिला चटकन उचलतो—एक खारट पापा घेतो.
आईचे घर उन्हात बांधण्याचे आश्वासन देत
चांदण्यांचे गाणे तिला म्हणून दाखवतो.
तिची कविता त्याच्या ओठावर
आणि त्याची कविता त्याच्या कडेवर.
इथे मात्र माझ्या भूतदयेला मीच डिवचून जातो.
कविसंमेलनानंतर त्याच्या घरी जाण्याचे
सहसा मी टाळत असतो.

## दोघांच्याही पडद्याआड

खऱ्याखोट्यांतले चार बोटांचे अंतर
शक्य तितके कमी करण्यासाठी
नाकाने चष्म्याच्या काड्यांचा पूल बांधला.
दळणवळण सुरू झाले.
खरे-खोटे बेमालूमपणे मिसळून गेले.
डोळ्यांचा कानावरती कधीच विश्वास नव्हता,
कानालाही स्वतःशी प्रतारणा जमेना.
शेवटी नाकाने दोघांमध्ये भिंत उभारली.
आता दोन्ही बाजूंना
थोडे खरे–थोडे खोटे,
आणि दोघांच्याही पडद्याआड
अस्सल खरे–अस्सल खोटे,
आसवांचा लोंढा थोपविण्यासाठी....

# पहाटस्वप्नांसाठी

माझ्याच काव्यसंग्रहाच्या काही प्रती
प्रकाशकाकडून मी विकत घेतल्या—
त्याला व्यावसायिक दिलासा देत,
इष्ट-अनिष्ट जिवलगांना वाटण्याचे ठरवून.

बँकेच्या पासबुकाखेरीज
दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाची जरुरी वाटत नसणाऱ्या
माझ्या खास मित्रांना एकेक प्रत....

एखाद्या अज्ञात हस्तस्पर्शाच्या आशेवर झुलवीत
धुळीखाली खोल खोल गाडून टाकणाऱ्या
वाचनालयांच्या कपाटांना एकेक प्रत....

'सप्रेम भेट'च्या पुस्तकांनी आपल्या शोकेस सजविणाऱ्या
'इंटीरियर डेकोरेटर्स'ना एकेक प्रत....

सुरळीत मानवी संबंधासाठी
ऑफिसचा हेडक्लार्क आणि साहेब यांना एकेक प्रत....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

कविसंमेलनाच्या वेळी माझी आठवण व्हावी
म्हणून अनेक सार्वजनिक संस्थांच्या
अध्यक्षांना आणि कार्यवाहांना एकेक प्रत....

'साभार पोच'ची औपचारिक दखल घेणाऱ्या
वृत्तपत्रे, दैनिके, साप्ताहिके, मासिके इत्यादी
छापेवाल्यांना एकेक प्रत....

जिच्या डोळ्यांतच मी सर्व कविता वाचल्या
तिलाही एक प्रत....

प्रती वाटताना मी माझ्या काव्यसंग्रहात
एक लहानशी दुरुस्ती केली :
काव्यसंग्रहांवरची वेष्टने काढून,
त्यांत रेल्वेची टाइमटेबले भरून
प्रत्येकाला प्रत दिली.
आतल्या सर्व कविता
माझ्या पहाटस्वप्नांसाठी काढून घेत.

## पहाटस्वप्नांसाठी

माझ्याच काव्यसंग्रहाच्या काही प्रती
प्रकाशकाकडून मी विकत घेतल्या—
त्याला व्यावसायिक दिलासा देत,
इष्ट-अनिष्ट जिवलगांना वाटण्याचे ठरवून.

बँकेच्या पासबुकाखेरीज
दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाची जरुरी वाटत नसणाऱ्या
माझ्या खास मित्रांना एकेक प्रत....

एखाद्या अज्ञात हस्तस्पर्शाच्या आशेवर झुलवीत
धुळीखाली खोल खोल गाडून टाकणाऱ्या
वाचनालयांच्या कपाटांना एकेक प्रत....

'सप्रेम भेट'च्या पुस्तकांनी आपल्या शोकेस सजविणाऱ्या
'इंटीरियर डेकोरेटर्स'ना एकेक प्रत....

सुरळीत मानवी संबंधासाठी
ऑफिसचा हेडक्लार्क आणि साहेब यांना एकेक प्रत....